# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः30.06.2025** **वारःसोमवार**

---

1. देशभरातील 64 टक्क्यांपेक्षा अधिक नागरिक सामाजिक योजनांचे लाभार्थी-पंतप्रधानांचं प्रतिपादन
2. पुरी इथं झालेल्या चेंगराचेंगरीच्या दुर्घटनेचे उच्चस्तरीय चौकशीचे आदेश
3. महाराष्ट्र विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन आजपासून आणि
4. पावसाच्या संततधारेमुळे हिमाचल प्रदेशात जनजीवन विस्कळीत

**मन की बात**

आरोग्य ते सामाजिक सुरक्षा अशा क्षेत्रात देशभरातील नागरिकांना विविध योजनांचे लाभ मिळत आहेत. आंतरराष्ट्रीय कामगार संघटना अर्थात आयएलओने जाहीर केलेल्या अहवालात नमूद केल्याप्रमाणे भारतातील 64 टक्क्यांहून अधिक लोक कोणत्या ना कोणत्या सामाजिक संरक्षण योजनांचा लाभ घेत आहेत असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल सांगितलं. आकाशवाणीवरच्या मन की बात या कार्यक्रमाच्या एकशे तेविसाव्या भागात ते काल बोलत होते. आणीबाणीच्या घटनेला पन्नास वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त, देशात संविधान हत्या दिवस पाळला गेला; त्याबाबत त्यांनी माहिती दिली. मोरारजी देसाई आणि अटलबिहारी वाजपेयी या माजी पंतप्रधानांनी आणीबाणीच्या निषेधात केलेल्या भाषणांचा अंशही त्यांनी ऐकवला. आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त देशासह जगभरात झालेल्या विविध उपक्रमांचा त्यांनी गौरवपूर्ण उल्लेख केला. देशाच्या विविध भागात सध्या सुरू असलेल्या यात्रा, आणि या यात्रांमध्ये सहभागी होणारे भाविक म्हणजे एक भारत श्रेष्ठ भारत भावनेचं प्रतिबिंब असल्याचं पंतप्रधान म्हणाले. महाराष्ट्रातल्या छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातल्या पाटोदा ग्रामपंचायतीनं सामूहिक प्रयत्नातून स्वच्छतेबाबत केलेल्या उपाययोजनांची माहिती पंतप्रधानांनी दिली.....

**छत्रपति संभाजी नगर ज़िले की ग्राम पंचायत है 'पाटोदा'। ये Carbon Neutral गाँव पंचायत है। इस गाँव में कोई अपने घर के बाहर कचरा नहीं फेंकता। हर घर से कचरा इकट्ठा करने की पूरी व्यवस्था है। यहाँ गंदे पानी का Treatment भी होता है। बिना साफ किए कोई पानी नदी में नहीं जाता। यहाँ उपलों से अंतिम संस्कार होता है और उस राख से दिवंगत के नाम पर पौधा लगाया जाता है। इस गाँव में साफ-सफाई भी देखते ही बनती है। छोटी-छोटी आदतें जब सामूहिक संकल्प बन जाती हैं, तो बड़ा बदलाव तय हो जाता है।**

जागतिक आरोग्य संघटनेनं भारत हा ट्रॅकोमा या डोळ्यांच्या आजारापासून मुक्त झाल्याची घोषणा केली असल्याची माहिती मोदी यांनी दिली. आपलं सामर्थ्य वाढवण्यासाठी आरोग्याकडे लक्ष देण्याचं आवाहन त्यांनी केलं. आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकात पोहोचलेले पहिले भारतीय ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला यांच्याशी झालेल्या संवादाविषयी देखील पंतप्रधानांनी श्रोत्यांना सांगितलं.

**जगन्नाथ-यात्रा**

ओडिशातील जगन्नाथ यात्रेदरम्यान पुरी इथं श्री गुंडीचा मंदिराजवळ काल सकाळी झालेल्या चेंगराचेंगरीच्या दुर्घटनेच्या उच्चस्तरीय प्रशासकीय चौकशीचे आदेश ओडिशा सरकारने दिले आहेत. यामध्ये दोन महिलांसह तीन भाविकांचा मृत्यू झाला आणि अनेक जण जखमी झाले आहेत. ओडिशाच्या विकास विभागाच्या आयुक्त अनु गर्ग या घटनेची चौकशी करतील. ओडिशा सरकारने

मृतांच्या नातेवाईकांना पंचवीस लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. काल पहाटे साडेचारच्या दरम्यान भगवान जगन्नाथ, भगवान बलभद्र आणि देवी सुभद्रा यांच्या रथांवर, नंदीघोश, तालध्वज आणि देवदलना हे विधी सुरु असताना ही दुर्घटना घडली. या यात्रेसाठी मोठ्या संख्येने दरवर्षी हजारो भाविक पुरी इथं जमतात. या पार्श्वभूमीवर कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी राज्य सरकारने पुरीचे जिल्हा दंडाधिकारी आणि पोलिस अधीक्षक यांची बदली केली असून इतर दोन वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनाही निलंबित करण्यात आले आहे. मुख्यमंत्री मोहनचरण माझी यांनी भाविकांच्या मृत्यूबद्दल तीव्र शोक व्यक्त केला आहे.

**<u>विद्यापीठ-अनुदान-आयोग</u>**

चार तंत्रशिक्षण संस्था अर्थात IITs, 3 व्यवस्थापन संस्था अर्थात IIMs आणि अलिगढ मुस्लिम विद्यापीठासह देशभरातील 89 शैक्षणिक संस्थांना रॅगिंगविरोधी नियमावलीत अनियमितता आढळल्याप्रकरणी विद्यापीठ अनुदान आयोगानं नोटीस जारी केली आहे. युजीसीच्या रॅगिंग नियमावली, 2009 नुसार, युजीसीशी संलग्न असलेल्या प्रत्येक संस्थेला विद्यार्थ्यांकडून रॅगिंग विरोधी हमी सादर करणे आवश्यक आहे. वारंवार सूचना देऊनही आणि पाठपुरावा करूनही, या संस्थांनी विद्यार्थ्यांकडून अनिवार्य असलेली अँटी-रॅगिंग हमी सादर केलेली नाही. याबद्दल ही नोटीस बजावण्यात आली आहे. शैक्षणिक संस्थांमध्ये नियमांचे पालन न करण्यामुळे केवळ यूजीसीच्या मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन होते असे नाही तर विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेलाही धोका निर्माण होतो. नियमांचे पालन न करणाऱ्या इतर संस्थांमध्ये एम्स रायबरेली आणि दिल्ली, आंध्र प्रदेश आणि हरियाणा इथल्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ डिझाइन यांचा समावेश आहे.

**<u>अमित शहा</u>**

शस्त्रास्त्रांचा वापर करणाऱ्या माओवाद्यांशी चर्चेची शक्यता केंद्रिय गृहमंत्री अमित शहा यांनी फेटाळून लावली आहे. तेलंगण राज्यातल्या निझामाबाद इथं आयोजित शेतकरी मेळाव्यात ते काल बोलत होते. आदिवासी, पोलिस आणि सुरक्षा दलाच्या जवानांची हत्या करणाऱ्यांसोबत कुठलीही चर्चा होऊ शकत नाही असं म्हणत त्यांनी माओवाद्यांना हिंसाचाराचा त्याग करुन देशाच्या मुख्य प्रवाहात सामील होण्याचं आवाहन केलं. 31 मार्च 2026 पूर्वी भारतातला माओवाद संपवण्याचा केंद्र सरकारचा निर्धार असल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला. तेलंगणचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी राज्याला माओवाद्यांचं आश्रयस्थान बनू देऊ नये असं आवाहन अमित शहा यांनी केलं.

**<u>अधिवेशन</u>**

महाराष्ट्र विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन आजपासून मुंबईत सुरू होत आहे. अधिवेशनच्या पूर्वसंध्येला काल सरकारनं चहापानाचा कार्यक्रम आयोजित केला होता; या चहापानाच्या कार्यक्रमावर महाविकास आघाडीतील विरोधी पक्षांनी बहिष्कार टाकला. अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर सरकार आणि विरोधक दोघांनीही स्वतंत्रपणे पत्रकार परिषद घेत आपापली भूमिका स्पष्ट केली. राज्यात त्रिभाषा सूत्र राबवण्यासंदर्भातले दोन्ही शासन निर्णय रद्द करत असल्याची घोषणा काल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

**<u>IAEA</u>**

इराण आणि इस्त्रायल संघर्षाच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेद्वारे अलिकडच्या काळात झालेल्या हवाई हल्ल्यांमुळे इराणचा अणुकार्यक्रम "उद्ध्वस्त" झाला या दाव्यांवर संयुक्त राष्ट्रांच्या आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्था अर्थात IAEAचे महासंचालक राफेल ग्रोसी यांनी गंभीर शंका उपस्थित केली आहे. एका दुरचित्रवाणी वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत ते काल बोलत होते. अमेरिकेच्या हवाई हल्ल्यांमुळे इराणमधील अण्वस्त्र तळांचं नुकसान झालं असलं तरी पूर्णपणे नष्ट झालेले नाही. इराणने त्यांच्या अणुकार्यक्रमाचं संवर्धन करुन हा उपक्रम पुनरुज्जीवित करण्यासाठी आवश्यक असलेला तांत्रिक आणि औद्योगिक पाया कायम ठेवला आहे. दरम्यान, फॉरडो आणि नतांझ या भागात झालेल्या नुकसानाचा कोणताही अंतिम अहवाल अमेरिकेनं अद्याप जाहीर केला नसल्याचंही योवेळी बोलताना ते म्हणाले.

**एस जयशंकर**

क्वाड शिखर बैठकीत सहभागी होण्यासाठी परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉ एस जयशंकर आजपासून तीन दिवसांच्या अमेरिका दौऱ्यावर जात आहेत. अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री मार्को रुबिओ यांनी त्यांना निमंत्रित केलं आहे. पेहलगाम हल्ल्यानंतर प्रथमच क्वाड गटाच्या सदस्यांची बैठक होत आहे. हिंदप्रशांत क्षेत्रासंदर्भात यावेळी चर्चा होण्याची अपेक्षा आहे. न्युयॉर्कमधील मुख्यालयात दहशतावादाची मानवी किंमत याविषयावरील प्रदर्शनाचं उद्घाटन आज डॉ जयशंकर यांच्या हस्ते होणार आहे. पाकिस्तान संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेचे फिरत्या स्वरुपातील अध्यक्षपद स्वीकारण्याच्या एक दिवस आधी हा कार्यक्रम होत आहे.

**रेल्वे**

भारतीय रेल्वेकडून जाहीर करण्यात येणारा आरक्षण तक्ता आता रेल्वेगाडी निघण्याच्या आठ तास आधी तयार करण्यात यावा अश्या सूचना रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी रेल्वेमंडळाला दिल्या आहेत. हा नियम टप्प्याटप्प्याने लागू होईल. यामुळे आरक्षणाच्या प्रतिक्षायादीत असलेल्या प्रवाशांना दिलासा मिळेल आणि प्रवासाची इतर पर्यायांचा विचार करता येईल. अशी माहिती रेल्वे मंत्रालयाने दिली. भारतीय रेल्वे पुढील महिन्याच्या 1 तारखेपासून आयआरसीटीसी वेबसाइट आणि मोबाइल ॲपवर फक्त अधिकृत वापरकर्त्यांनाच तत्काळ तिकिटे आरक्षित करण्याची परवानगी देईल. या वर्षी जुलैच्या अखेरीस तात्काळ आरक्षणासाठी ओटीपी-आधारित प्रमाणीकरण केले जाईल. अशी माहितीही मंत्रालयानं दिली.

**राष्ट्रपती**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून दोन दिवसांच्या उत्तर प्रदेश दौऱ्यावर आहेत. बरैलीतील भारतीय पशुचिकित्सा संशोधन संस्थेच्या 11 व्या पदवीदान समारंभाला त्या उपस्थित राहतील. तसंच गोरखपूरमधील एम्सचा पदवीदान समारंभ, उत्तर प्रदेशातील पहिल्या महायोगी गुरु गोरखनाथ आयुष विद्यापीठ तसच मुलींच्या वसतीगृहाचं उद्घाटन त्यांच्या हस्ते होणार आहे.

**हिमाचल पाऊस**

पावसाच्या संततधारेमुळे हिमाचल प्रदेशात जनजीवन विस्कळीत झालं आहे. काल जोगिंदरनगर, कसौली आणि पांवटा साहिब गावात शंभर मिलीमीटरपेक्षा जास्त पावसाची नोंद झाली. राज्यातल्या सर्व मोठ्या नद्यांना पूर आला आहे तसंच धरणांतूनही नियमितपणे पाण्याचा विसर्ग सुरू आहे. दरड कोसळल्यामुळे 129 रस्ते वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आले आहेत. पावसामुळे झालेल्या दुर्घटनांमधे आतापर्यंत 39 जणांना आपला जीव गमवावा लागला असून 4 जण अजूनही बेपत्ता आहेत. नागरिकांनी नदीजवळ जाऊ नये, अनावश्यक पर्यटन टाळावं आणि प्रशासनाच्या सूचनांचं पालन करावं असं आवाहन करण्यात आलं आहे. हा संपूर्ण आठवडा राज्यात मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**हवामान**

झारखंडमध्ये तुरळक ठिकाणी अतीवृष्टीचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. कोकण, गोवा, विदर्भ आणि मध्य महाराष्ट्रासह चंदीगड, दिल्ली, हिमाचल प्रदेश, पंजाब, उत्तर प्रदेश तसंच उत्तराखंडमध्ये आज तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाचा अंदाज आहे.  या आठवड्यात ओडिशा, बिहार, मध्य प्रदेश आणि छत्तीसगडमध्ये तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे. ईशान्येकडील राज्यांमधेही आज तुरळक ठिकाणी अतीवृष्टीचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.